**ठळक बातम्या**

- संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते लखनऊ इथल्या ब्राम्होस एकात्मिकरण आणि चाचणी सुविधा केंद्राचं उद्घाटन

- पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूर आणि त्यानंतरची शस्त्रसंधी या मुद्द्यांवर संसदेचं विशेष अधिवेशन बोलवायची विरोधकांची मागणी

- मालवणजवळ राजकोट इथं उभारलेल्या छत्रपती शिवाजीमहाराजांच्या पुतळ्याचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पूजन

- खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंची ७४ पदकांची कमाई

**आणि**

- महिला क्रिकेट एकदिवसीय तिरंगी मालिकेत भारताविरुद्धच्या सामन्यात श्रीलंकेपुढं विजयासाठी ३४३ धावांचं लक्ष्य

**<><><><><>**

भारतानं ऑपरेशन सिंदूर अंतर्गत केलेली कारवाई म्हणजे भारताच्या राजकीय, सामाजिक आणि धोरणात्मक इच्छाशक्तीचं तसंच आणि लष्करी सामर्थ्य आणि निर्धारचं प्रतिक आहे असं

केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. राजनाथ सिंह यांनी आज दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून लखनऊ इथल्या ब्राम्होस एकात्मिकरण आणि चाचणी सुविधा केंद्राचं उद्घाटन केलं. त्यावेळी ते बोलत होते. हा प्रकल्प म्हणजे भारतानं संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेच्या दिशेनं टाकलेलं मोठं पाऊल आहे आणि यामुळे भारताची ताकद वाढेल असं ते म्हणाले. ब्रह्मोस हे केवळ शस्त्र

नाही तर ते, शत्रूला भारतीय सशस्त्र दलांच्या सामर्थ्याचा इशारा देणारं आणि सीमांचं रक्षण करण्याच्या वचनबद्धतेचा संदेश आहे असं त्यांनी सांगितलं.

आज राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन असल्यानं सुविधा केंद्राच्या उद्घाटनाला विशेष महत्व आलं असल्याचं ते म्हणाले. १९९८ मध्ये याच दिवशी तत्कालिन प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वात पोखरणमध्ये अणुचाचण्या करून शास्त्रज्ञांनी जगाला भारताची ताकद दाखवून दिली होती याचं स्मरणही त्यांनी यावेळी केलं.

या सुविधा केंद्रासोबतच खाजगी सार्वजनिक क्षेत्राच्या भागिदारीअंतर्गत लखनऊमध्ये पीटीसी इंडस्ट्रीज लिमिटेडद्वारे टायटॅनियम आणि सुपर-अलॉय धातू निर्मिती प्रकल्प सुरु केला जात असल्याचं, तसंच आणखी ७ महत्त्वाच्या प्रकल्पांची पायाभरणीही केली जात असल्याचंही त्यांनी सांगितलं..

**<><><><><>**

पाकिस्तानबरोबर शस्त्रसंधी जाहीर केल्यानंतर आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतल्या निवासस्थानी महत्त्वाची बैठक घेतली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग तसंच तिन्ही सेनादलांचे प्रमुख बैठकीला उपस्थित होते. युद्ध विरामाच्या घोषणेनंतर प्रधानमंत्र्यांनी काल घेतलेल्या बैठकीला परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर सुब्रह्मण्यम जयशंकर, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, आणि तिन्ही सेनादलांचे प्रमुख उपस्थित होते. भविष्यात घडणाऱ्या कोणत्याही दहशतवादी कृत्याला देशाविरुद्ध युद्धाची कृती मानून त्याला प्रत्युत्तर देण्याचा निर्णय भारतानं घेतला आहे, अशी माहिती सरकारी सूत्रांनी दिली. युद्धविरामाच्या घोषणेनंतर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्या दरम्यान काल रात्री दूरध्वनीवरून चर्चा झाली.

भारतीय हवाई दलानं ऑपरेशन सिंदूरमधे सोपवलेली कामगिरी सफाईनं आणि नेमकेपणाने राष्ट्रीय उद्दिष्टांनुसार पूर्ण केली आहे. अद्याप ही कारवाई सुरु असल्यानं त्याबाबतची तपशीलवार माहिती यथावकाश प्रसिद्ध केली जाईल असं

भारतीय हवाईदलाच्या सूत्रांनी सांगितलं. यासंदर्भात अधिक तर्क लढवू नये तसंच अफवांवर विश्वास ठेवू नये असं हवाईदलानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्रसरकारनं राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरला देशातल्या उद्योग क्षेत्रानं पाठिंबा दिला आहे. ही पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी आवश्यक कृती होती आणि देशातलं उद्योगक्षेत्र सरकारच्या पाठिशी आहे असं CII, अर्थात भारतीय उद्योग महासंघाचे अध्यक्ष संजीव पुरी यांनी सांगितलं. दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात उद्योगक्षेत्राचं सरकारला समर्थन आहे,असं ते वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत म्हणाले.

**<><><><>**

भारत पाकिस्तान दरम्यान तणाव असताना युद्धाच्या व्हिडीओ गेमच्या चित्रफिती भारत-पाकिस्तान संघर्षाच्या खऱ्या चित्रफिती म्हणून प्रसारित केल्या जात आहेत. अशा बनावट संदेशांपासून सावध रहावं तसंच ते पुढे प्रसारित करु नये, असं आवाहन पत्र सूचना कार्यालयानं केलं आहे. संरक्षण विभागाच्या कार्यालयाच्या नावानं समाजमाध्यमांवर फिरणारा इशारावजा संदेश खोटा असल्याचं  कार्यालयानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><>**

भारत पाकिस्तान दरम्यान युद्धविराम करायच्या निर्णयाचं जगभरातल्या देशांनी स्वागत केलं आहे. संयुक्त राष्ट्र संघाचे महासचिव अँटोनियो गुटेरेस यांनी युद्धविरामाचं स्वागत केलं असून उभय देशांनी विकासावर भर द्यावा असं आवाहन केलं आहे. हा करार शाश्वत शांततेसाठी योगदान देईल आणि या दोन देशांमधील व्यापक, दीर्घकालीन समस्यांवर चर्चा करण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करेल अशी गुटेरस यांना आशा असल्याचं त्यांचे प्रवक्ते स्टेफान डुजारिक यांनी सांगितलं. युरोपीय संघाचे परराष्ट्रव्यवहार प्रमुख काजा कल्लास यांनी शस्त्रसंधीचं महत्त्व

अधोरेखित करुन त्याच्या पालनाबाबत सतर्क राहण्याची गरज व्यक्त केली आहे. शांततेसाठी उचलेल्या पावलांचं स्वागत करीत यूनायटेड किंगडमनं युद्धविरामाबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

आज राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन आहे. १९९८ मध्ये आजच्याच दिवशी भारतानं राजस्थानात पोखरण इथं यशस्वी अणुचाचणी केली. या दिवशी देशाच्या प्रगती आणि विकासात तंत्रज्ञानाच्या महत्त्वाच्या भूमिकेचं स्मरण केलं जातं. पहिलं स्वदेशी विमान हंस-३ च्या प्रक्षेपणात आणि सहाव्या जागतिक अणुचाचणीत शास्त्रज्ञ, अभियंते आणि नवोन्मेषकांच्या योगदानाच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो.

**<><><><><>**

देशवासीयांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी नवीन तंत्रज्ञान विकसित करून योगदान देणाऱ्या शास्त्रज्ञ, अभियंते आणि तंत्रज्ञांना भारत सलाम करत असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी समाज माध्यमावरच्या एका पोस्टमध्ये म्हटलं आहे. राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनानिमित्त, १९९८ मध्ये पोखरण इथं यशस्वी चाचण्या करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या असाधारण प्रयत्नांचं राष्ट्र अभिमानानं स्मरण करत असून हा भारताच्या इतिहासातला एक निर्णायक क्षण होता, असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ला, ऑपरेशन सिंदूर आणि त्यानंतरचा युद्धविराम या मुद्द्यांवर संसदेचं विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी विरोधकांनी केली आहे.

काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्यसभेतले विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी तसं पत्र प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना लिहीलं आहे. या मुद्यांवर व्यापक चर्चा होणं आवश्यक असल्याचं मत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी व्यक्त केलं

आहे. भारत पाकिस्तान दरम्यान शस्त्रसंधीची घोषणा सर्वप्रथम अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी समाजमाध्यमांवर केली, तसंच अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी तटस्थ मंचाचा उल्लेख केला या विषयी त्यांनी आक्षेप घेतला असून सिमला करार डावलण्यात तर येत नाही ना असा प्रश्न उपस्थित केला आहे.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण इथे राजकोट किल्ल्यावर उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूजन करण्यात आलं. या सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार नारायण राणे, सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. या पुतळ्याच्या परिसर लवकरच योग्य प्रकारे विकसित करण्यात येईल, असंही फडणवीस यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

प्रलंबित खटल्यांच्या जलद निवारणासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालत उपक्रमात ठाणे जिल्ह्यानं प्रथम क्रमांक पटकावला आहे. यावर्षी दुसऱ्यांदा आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीत ठाणे जिल्हा न्यायालयात एकूण ९८ हजार ८९९ प्रकरणं मार्गी लागली तर एक अब्ज १२ कोटींहून अधिक रुपयांच्या प्रकरणांमध्ये यशस्वी तोडगा निघाला. यामध्ये सुमारे ३० वर्ष प्रलंबित खटल्यांचा निवडा करण्यात आला.

राष्ट्रीय लोकअदालत कार्यक्रमाला मुंबईतल्या लघुवाद न्यायालयातही उत्तम प्रतिसाद मिळाला. यावेळी १४८ पैकी ५८ प्रकरणं निकालात निघाली. सोलापुरातही २७ हजार ३२० प्रकरणं सामंजस्यानं मार्गी लागली तर ३१ जोडप्यांमधले विवाह विषयक वाद मिटवण्यातही यश आलं.

**<><><><><>**

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र -दुपारी ३.२० वाजता
११ मे २०२५ - रविवार

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आघाडी कायम ठेवत ७४ पदकांची कमाई केली आहे.अदिती हेगडेनं आतापर्यंत सहा पदकं मिळवली आहेत. कऱ्हाडच्या रिक्षाचालकाची कन्या अस्मिता ढोणे हिनं एकंदर १७० किलो वजन उचलून ४९ किलो गटात सुवर्ण पदक जिंकलं.आकांक्षा व्यवहारेनं भारोतोलन प्रकारात ४५ किलो गटात सुवर्ण पदक मिळवलं तर टेबल टेनिस मध्ये काव्या भटनं सलग दुसऱ्या दिवशी सुवर्णपदकावर आपलं नाव कोरलं. २७ सुवर्ण, २२ रौप्य आणि २५ कास्य पदकांसह महाराष्ट्र पदक तालिकेत अव्वल स्थानावर आहे. १४ सुवर्ण पदकांसह ३९ पदक मिळवून कर्नाटक दुसऱ्या स्थानावर तर राजस्थान २३ पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

महिलांच्या एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत कोलंबो इथं श्रीलंकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात भारतानं श्रीलंकेपुढं विजयासाठी ३४३ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे.

भारतीय संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला होता. भारतानं निर्धारित ५० षटकांमध्ये सात गडी गमावून ३४२ धावा केल्या. १०१ चेंडूत ११६ धावा करून शानदार शतक झळकावणाऱ्या स्मृती मानधनाने सर्वाधिक धावा काढल्या. तिचं एकदिवसीय क्रिकेटमधलं हे अकरावं शतक होतं. एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं करणारी ती तिसरी महिला क्रिकेटपटू ठरली आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा, श्रीलंकेच्या १६ षटकांमध्ये २ बाद ७८ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**